राज्यातील जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यातील तसेच निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांचे मधील कामाचे फेरवाटप करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**

क्रमांक : संकिर्ण-२०२५/प्र.क्र.२७१/आस्था-०१ (ई-१४९४८३७)
मंत्रालय मुख्य इमारत,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दिनांक - ०३ जुलै, २०२६

**वाचा: -**

१. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ०२/२०११/प्र.क्र.१३/ई-१, दि.२९.०३.२०१२
२. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ०२/२०१२/प्र.क्र.४३/ई-१, दि.२८.१२.२०१२
३. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-०२/२०१२/प्र.क्र.४३/ई-१, दि.०४/१०/२०१३.
४. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण २०१४/०५/प्र.क्र.६९/ई-१, दि.०२.०६.२०१४.
५. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२८/ई-१अ, दि.२४/०४/२०१७.
६. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.कार्यशा-२०२५/प्र.क्र.०६/म-८ दि.०९/०४/२०२५.

**<u>प्रस्तावना :-</u>**

महसूल व वन विभागाचे विविध शासन निर्णय व शासन परिपत्रकांन्वये जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यामधील अधिकार व कामकाजाचे विषयांचे वाटप निश्चित करण्यात आलेले आहे. प्रशासकीय कार्यपद्धतीत झालेल्या कालानुरूप बदलांचा विचार करून सदर विषयांचे पुनर्विलोकन करून सुधारित व सुसंगत वाटप निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी अहवाल सादर केला आहे. दि. ४ व ५ एप्रिल २०२५ रोजी पुणे येथे आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेत मा. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने प्रशासनाच्या कार्यपद्धती व संरचनेत सुधारणा सुचविण्यासाठी प्रत्येक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विषयनिहाय सहा अभ्यास समित्या गठीत करण्याबाबत निर्देशित करण्यात आले. त्यानुसार महसूल व वन विभागाच्या संदर्भाधिन क्र.६ येथील शासन निर्णयान्वये सदर समित्यांची स्थापना करण्यात आली. या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी शासनास सादर केलेल्या अहवालातील परिशिष्ट-१९ व परिशिष्ट-२० मध्ये जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी तसेच निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांच्यामधील अधिकार व कामकाजाचे वाटप याबाबत काही बदल व दुरुस्त्या सुचविलेल्या

आहेत. सध्याच्या प्रशासकीय गरजा, कामकाजातील वाढलेली गुंतागुंत व जबाबदाऱ्यांचा विचार करता जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांचेकडील विषयांचे फेरवाटप प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच, निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांच्यातील कामकाजाचे स्पष्ट वाटप अद्याप शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आलेले नसल्याने राज्यातील सहा महसूल विभागांतील जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये विषयांच्या वाटपात भिन्नता आढळून येत आहे. प्रशासनात एकसंधता, सुसूत्रता व स्पष्ट जबाबदारी निश्चित होण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी तसेच निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांच्यामधील विषयांचे स्पष्ट वाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यातील तसेच निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांचे मधील कामाचे खालीलप्रमाणे फेरवाटप करण्यात येत आहे.

**<u>जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांचेतील कामकाजाचे वाटप -</u>**

| जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द करावयाचे विषय | अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द करावयाचे विषय |
|---|---|
| १. जिल्ह्यातील सर्व विभागांचे संनियंत्रण व पर्यवेक्षण<br>२. राजस्व अभियान<br>३. राष्ट्रीय भुमी अभिलेखांचे आधुनिकीकरण कार्यक्रम, ॲग्रीस्टॅक योजना व अनुषंगीक बाबी.<br>४. गौण खनिज<br>५. गृह शाखा (कायदा व सुव्यवस्था, शस्त्र परवाना, स्फोटक परवाना, मनोरंजन कार्यक्रम परवानगी, VDO परवानगी )<br>६. दुर्बल घटकावरील अत्याचारांना प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे.<br>७. अन्न व नागरी पुरवठा विषयक बाबी<br>८. सरफेसी कायदा व ज्येष्ठ नागरीक निर्वाह भत्ता कायदेविषयक बाबी<br>९. जनगणना<br>१०. भारत निवडणूक आयोग यांचेकडील निवडणुका<br>११. रोजगार हमी योजना<br>१२. जिल्हा नियोजन<br>१३. नैसर्गिक आपत्ती व मदत कार्य<br>१४. सैनिक कल्याण व जिल्हा सैनिक मंडळ<br>१५. अल्पबचत | १. सर्व प्रकारची शासकिय वसुली व वार्षिक जमाबंदी<br>२. जिल्ह्यातील सर्व जमिनींचे व्यवस्थापन<br>३. भूसंपादन<br>४. करमणुक कर<br>५. नागरी कमाल मर्यादा व त्यानुषंगिक बाबी<br>६. इतर शासकिय वसूली (आर.आर.सी वसुली)<br>७. भुमी अभिलेख सर्वेक्षण व वार्षिक जमाबंदी<br>८. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका<br>९. ग्राम पंचायत निवडणूका (ग्रा.पं.त विवाद अर्ज व अपिल वगळून)<br>१०. शासनाच्या जमीन सुधारणा योजना/धोरणांची प्रभावी अंमलबजावणी.<br>११. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व इतर अधिनियमा खालील अपिले<br>१२. गावठाण विस्तार योजना<br>१३. स्वातंत्र्य सैनिक बाबत विविध प्रकरणे<br>१४. पिक अंदाज सर्वेक्षण व पिकाचे पुर्वानुमान पैसेवारी व कृषि गणना<br>१५. संपूर्ण जिल्हयातील कमाल जमीन धारणा, कुळ वहिवाट, अदिवासींना जमीन परत करणे, इत्यादी कायद्याबाबत अंमलबजावणी<br>१६. निर्वासित संपत्ती अधिनियम |

| | |
|---|---|
| १६. शासकिय निवासस्थानांचे वाटप<br>१७. नगर पालिका प्रशासन<br>१८. दारुबंदी व उत्पादन शुल्क विषयक बाबी<br>१९. तक्रार निवारण, राजशिष्टाचार, अति महत्त्वाच्या व्यक्तींचे दौरे<br>२०. आस्थापना विषयक बाबी<br>२१. खरेदीसारख्या वित्तीय बाबी जिथे विभाग प्रमुख म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी अधिकाराचा वापर करावयाचा आहे.<br>२२. पतपुरवठा नियोजन आणि त्यासंबंधी इतर बाबी.<br>२३. टंचाई व अनुषंगिक बाबी<br>२४. आरोग्यविषयक कार्यक्रम<br>२५. वेठबिगारांचे पुनर्वसन<br>२६. औद्योगिक विकास व जिल्हा उदयोग केंद्र विषयक बाबी<br>२७. जिल्हा पातळीवरील सर्व साधारण समन्वय आणि समिती बैठका<br>२८. या यादीमध्ये समाविष्ट नसलेले विषय.<br>२९. शासन व विभागीय आयुक्त सोपवतील असे कोणतेही अन्य विषय | १७. दुय्यम कार्यालयांची तपासणी, रचना व कार्यपद्धती व कर्मचारी प्रशिक्षण<br>१८. कार्यक्रम अंदाजपत्रक व लेखा परीक्षण<br>१९. वक्फ बोर्ड अधिनियम खालील प्रकरणे<br>२०. मुद्रांक अधिनियम, नोंदणी अधिनियम व त्याखालील बाबी<br>२१. निखात निधी अधिनियम<br>२२. सामाजिक अर्थसहाय्य योजना<br>२३. प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन व पुरग्रस्तांचे पुनर्वसन<br>२४. भाडे नियंत्रण कायद्याविषयी पत्रव्यवहार<br>२५. विनिर्दिष्ट सहकारी संस्थाविषयक बाबी.<br>२६. शासकीय मुद्रनालयाकडून निरनिराळे नमुने, लेखनसामग्री, छापील साहित्य इत्यादीचा पुरवठा<br>२७. शासन, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी सोपवतील असे कोणतेही अन्य विषय. |

## निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांचेतील कामकाजाचे वाटप

| **निवासी उपजिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द करावयाचे विषय** | **उपजिल्हाधिकारी (महसूल) यांचेकडे सुपूर्द करावयाचे विषय** |
|---|---|
| १. महसूल शाखा ( शहरी व ग्रामिण भागातील सरकारी जमीनींचे व्यवस्थापन),<br>२. भोगवटदार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ करणे व विक्री परवानगी.<br>३. बिनशेती परवानगी, सिटीएस जमीनीबाबतची प्रकरणे<br>४. आस्थापना विषयक कामकाज<br>५. गृह / दंडाधिकारी कामकाज (कायदा व सुव्यवस्था)<br>६. शस्त्र परवाना, सिनेगृह व व्हिडीओ गृह परवाना<br>७. गौणखनिज<br>८. शासकिय वसूली, आर.आर.सी. वसुली व तद्अनुषंगीक कामकाज<br>९. टंचाई, पिक सर्वेक्षण, पिक विमा, पाणी आरक्षण, पिक पैसेवारी व अनुषंगिक बाबी.<br>१०. नैसर्गिक आपत्ती व मदत वाटप | १. राजस्व अभियान<br>२. महसूल-१, (आदिवासी जमीन, भुदान जमीनी, सिलींग जमीनी, इनाम जमीनी व्यवस्थापन व तद्अनुषंगीक बाबी.)<br>३. गावठाण विस्तार योजना<br>४. वनहक्क व पेसा कायद्याची अंमलबजावणी<br>५. कृषी गणना, ॲग्रिस्टॅक<br>६. राष्ट्रीय भुमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम<br>७. संगायो (सामाजिक अर्थ सहाय्य योजना)<br>८. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका (ग्राम पंचायत व जिल्हापरिषद)<br>९. लेखा/हिशोब/लेप/महालेखाकार मुंबई व नागपूर बाबत कामकाज |

| | |
|---|---|
| ११. पिक कर्ज, कर्ज माफी व अनुषंगीक बाबी.<br>१२. राजशिष्टाचार व राष्ट्रीय कार्यक्रम, तक्रार निवारण<br>१३. सेतू विषयक कामकाज<br>१४. सामान्य प्रशासन व ई-ऑफिस<br>१५. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ बाबत कामकाज<br>१६. ऑनलाईन तक्रार निवारण (आपले सरकार, पी.जी. पोर्टल)<br>१७. दशवार्षिक जनगणना<br>१८. सैनिक कल्याण<br>१९. दिवाणी संहिता, BNSS अंतर्गत कामकाज<br>२०. औद्योगिक विकास व गुंतवणुक समन्वय<br>२१. शासन , विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी सोपवतील असे अन्य कामकाज. | १०. कार्यालयीन तपासणी व लेखा परिच्छेद अनुपालन<br>११. कार्यक्रम अंदाजपत्रक<br>१२. जिल्हास्तरील बैठकांचे आयोजन (लोकशाही दिन, भ्रष्टाचार निर्मुलन समिती बैठक व तद्अनुषंगीक बाबी).<br>१३. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समिती विषयक कामकाज.<br>१४. महसूल अधिकारी यांचे बैठक<br>१५. शासन , विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी सोपवतील असे अन्य कामकाज. |

२. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०७०३१६०८३२१७१९ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.07.03 16:18:08 +05'30'

**(महेश वरुडकर)**
**शासनाचे उप सचिव**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
२. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
३. मा.उप मुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रीडा व अल्पसंख्यांक विकास) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
५. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
७. सर्व विभागीय आयुक्त.
८. सर्व जिल्हाधिकारी.
९. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२ मुंबई /नागपूर.
११. अधिदान व लेखा अधिकारी/निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१३. संचालक व लेखा कोषागरे, मुंबई.
१४. निवड नस्ती (कार्यासन आस्था-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.